संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक माणदेशी बुलंद आवाज...

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे
मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com




● वर्ष : ७ वे ● ● अंक : ४८ वा ● ● मंगळवार दि. १५ ऑगस्ट २०२३ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025

# भाजपसोबत गेलेल्यांशी आमचा संबंध नाही : शरद पवार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेध्ये कसलेही संभ्रमाचे वातावरण नाही. जे भाजपसोबत गेले आहेत त्यांच्यासोबत आमचा कसलाही सहभाग नाही. पुन्हा पुन्हा प्रश्न विचारून संभ्रम तयार करू नका, अशी स्पष्टोक्ती राष्ट्रवादीचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी दिली. बारामतीत ते पत्रकारांशी बोलत होते. पवार म्हणाले, महाविकास आघाडीमध्ये आम्ही विचाराने एकत्र आलो आहोत. भाजपसंबंधी आमची भूमिका देश व राज्य पातळीवर स्पष्ट आहे. भाजपशी संबंधित घटकांशी आमचा कोणताही संबंध असण्याचे कारण नाही.



शरद पवार

महाविकास आघाडीची बैठक मुंबईत ३१ ऑगस्ट रोजी आहे. दि. १ रोजी इंडियाची हयात हॉटेलमध्ये बैठक आहे. त्याची जबाबदारी माझ्यासह माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी घेतली आहे. आम्ही ती उत्तमरितीने आयोजित करू. या बैठकीला काँग्रेसम्ध्य्न कोण हजर राहणार हे माहित नाही. प्रकाश आंबेडकर यांच्यासंबंधी मविआमध्ये अद्याप काहीही चर्चा झालेली नसल्याचे पवार म्हणाले.

राज्यात दुष्काळी भागात दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे, यासंबंधी पवार म्हणाले, बारामतीसारख्या ठिकाणी टँकर लावण्याची वेळ आली आहे. काही ठिकाणी लोक चारा छावण्या सुरु करा अशी मागणी करू लागले आहेत. त्याचे मुख्य कारण पाऊस काही भागामध्ये नाही. काही ठिकाणी पेरण्या झाल्या पण पाऊस न झाल्यामुळे दुबार पेरणीचे संकट आले आहे. राज्य शासनाने या संकटाकडे गांभिर्याने बघावे आणि शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहावे असे आवाहन पवार यांनी केले.

नेपाळमधून टोमॅटो आयात करण्याच्या केंद्राच्या निर्णयाबद्दल ते म्हणाले, इथे शेतकऱ्यांना दोन पैसे अधिक मिळू लागल्यावर परदेशातून माल आणण्याची भूमिका केंद्र सरकार घेते. याचा स्वच्छ अर्थ हा आहे की शेतकरी उत्पादकाला यातना कशा देता येईल ही भूमिका सरकार घेते आहे. आयात करणे म्हणजे शेतकऱ्यांच्या दुःखावर डागण्या देण्यासारखे आहे.

ठाण्यात एका रुग्णालयात घडलेली घटना चिंताजनक आहे. मुख्यमंत्री ठाण्यातील आहे. मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात अशा घटना घडत असतील तर राज्य कोणत्या दिशेनं चाललंय याचा उत्तम नमुना बघायला मिळाला. मृत्यूमुखी पडलेल्यांच्या दुःखात मी सहभागी आहे. हे चित्र दुरुस्त करण्यासाठी अत्यंत कठोर पावले शासनाने टाकली पाहिजेत अशी अपेक्षा पवार यांनी व्यक्त केली. तसेच जयंत पाटील यांच्या भावाला नोटीस आली त्याची माहिती माझ्या कानावर आली आहे. सत्तेचा गैरवापर करून ही पावले टाकली जात आहेत. आमच्या सहकाऱ्यांना नोटीसा आल्या आणि ते भाजप सोबत जाऊन बसले. आज तशीच भूमिका जयंत पाटील यांच्या संदर्भात घेतलेली दिसते. पण ते भूमिकेवर ठाम आहेत, असे शरद पवार म्हणाले.

# आटपाडीत भाजपकडून विभीषिका स्मृतिदिन निमित्त मुकयात्रा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने विभीषिका स्मृतिदिन निमित्त मुकयात्रा काढण्यात आली. सदरची मुकयात्रा ही नगरपंचायत आटपाडी येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून ते अण्णाभाऊ साठे चौक येथील अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यापर्यंत दंडाला काळ्या फिती बांधून काढण्यात आली.



आटपाडी : विभीषिका स्मृतिदिन निमित्त भाजप कडून काढण्यात आलेल्या मुकयात्रेमध्ये सहभागी हर्षवर्धन देशमुख, अनिल पाटील, जयवंत सरगर व मान्यवर

१४ ऑगस्ट १९४७ रोजी आपल्या भारत देशाची फाळणी झाली. त्या फाळणीमध्ये ज्या वीरांनी आपले प्राण गमावले त्या सर्व विरांना आदरांजली म्हणून फाळणी विभीषिका स्मृतिदिन आयोजित करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आज नगरपंचायत आटपाडी येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून ते अण्णाभाऊ साठे चौक येथील अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यापर्यंत दंडाला काळ्या फिती बांधून मुकयात्रा काढण्यात आली.

या मूकयात्रेमध्ये माजी सभापती हर्षवर्धन देशमुख, ओबीसी मोर्चा सांगली जिल्हा अध्यक्ष विलास काळेबाग, युवा नेते जयवंत सरगर, अनिल पाटील, जिल्हा चिटणीस प्रमुख प्रमोद धायगुडे, आटपाडी तालुका युवा मोर्चा अध्यक्ष प्रणव गुरव यांच्यासह खरसुंडीचे सरपंच भीमराव इंगवले, इं विठलापूरचे सरपंच विठ्ठल बाड, अनिल सूर्यवंशी, नरेंद्र दीक्षित, यल्लाप्पा पवार, अनिल कदम, विलास जानकर, नवनाथ रणदिवे, शेखर रणदिवे, दुर्योधन जावीर, जीवन कासार, अनिरुद्ध देशमुख, संग्राम नवले, ओंकार डुबुले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# प्रा. नारायण खरजे यांचा सत्कार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस प्रा.नारायण उर्फ एन.पी. खरजे यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या रोजगार व स्वयंरोजगार विभाग प्रमुख पदावर निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ट नेते रावसाहेबकाका पाटील यांच्या हस्ते फेटा बांधून, शाल, श्रीफळ देत सत्कार करणेत आला.



आटपाडी : प्रा. नारायण खरजे यांचा सत्कार करताना रावसाहेबकाका पाटील, सादिक खाटिक, निखील कोळेकर व उपस्थित मान्यवर

कुणाचेही गुलाम न बनता माजी आमदार आण्णासाहेब लेंगरे, माजी सभापती धुळाजीराव झिंबल यांच्या सारखे कणखर वृत्तीचे स्वाभीमानी राजकारण, समाजकारण करावे. भविष्यात आटपाडी तालुक्यातल्या नेतृत्वाला आमदार, नामदार होण्याची संधी मिळावी, यासाठी मुंबई पर्यत कार्यरत रहावे. दोन चार आटपाडीकर मुंबई व भागातून आमदार कसे बनतील यासाठी सदैव प्रयत्न करावेत असे रावसाहेबकाका पाटील म्हणाले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशचे महासचिव सादिक खाटीक, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे आटपाडी तालुका अध्यक्ष सुरज पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पदवीधर सेलचे तालुका कार्याध्यक्ष मनोज भोसले, राष्ट्रवादी युवकचे तालुका सरचिटणीस नितीन डांगे, सुनिल लेंगरे लेंगरेवाडी, सुखदेव खताळ, निखिल कोळेकर, धनाजी सरगर विभूतवाडी, सुहास खंदारे इत्यादी अनेक जण उपस्थित होते.

# ...तर मी दंड थोपटून रिंगणात उभा : विलासराव जगताप

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**जत :** तम्मनगौडा रवीपाटील यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून पडळकर तालुक्यातील पदाधिकऱ्यांच्या देवेंद्र फडणवीस यांच्याशी भेटी घडवून आणत आहेत. निधी देण्याचे आश्वासन देत आहेत. मात्र, पडळकरांना त्यांच्या गावात कोणी विचारत नाही. ते जतमध्ये लिंगायत व धनगर समाजाचे समीकरण जमवत आहेत. मात्र, कोणी बाहेरची व्यक्ती तालुक्यात लुडबूड करत असेल तर मी दंड थोपटून रिंगणात उभा असेन, असा इशारा भाजपचे माजी आमदार विलासराव जगताप यांनी दिला. सर्व जिल्हा परिषद गटांत जाऊन नेते व कार्यकर्त्यांची मते जाणून घेऊ. एकमत असेल तर सर्व पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन विधानसभेचा उमेदवार ठरवू असेही त्यांनी स्पष्ट केले.



विलासराव जगताप

माजी आमदार विलासराव जगताप यांच्या नेतृत्वाखाली येथे भाजपचा कार्यकर्ता मेळावा झाला. केंद्रीय सिमेंट कॉर्पोरेशनचे संचालक डॉ. रवींद्र आरळी, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक प्रकाशराव जमदाडे, सुनील पवार, आकाराम मासाळ, मोहन कुलकर्णी, रवींद्र सावंत, प्रभाकर जाधव, आप्पासाहेब नामद, चंद्रकांत गुडोडगी, लक्ष्मण बोराडे आदींसह भाजपचे जगताप समर्थक मोठ्या संख्येने मेळाव्यात सहभागी होते.

जगताप म्हणाले, माझी वाटचाल संघर्षाची आहे. मी जनतेच्या जीवावरच निवडला गेलो. प्रत्येक पक्षात तालुक्याच्या प्रमुख पदावर राहिलो. योग्य निर्णय घेतले. मात्र, भाजपने तम्मनगौडा रवीपाटील यांना निवडणूक प्रचार प्रमुखपद देऊन चूक केली. ती सुधारण्यासाठी आम्ही उपमुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र दिले आहे. ते निर्णय घेतील, निर्णय घेत नसतील तर बैठक घेऊन पुढचा निर्णय घेऊ असे ते म्हणाले.

# अजित पवारांबरोबर बैठक गुप्त नव्हती : शरद पवार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सोलापूर :** राष्ट्रवादीच्या फुटीनंतर पुण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार आणि शरद पवार यांची 'गुप्त' भेट झाल्याची राजकीय चर्चा रंगली असताना त्यावर स्वत: पवार यांनीच उत्तर दिले आहे. ''ती बैठक गुप्त नव्हती. कुटुंबातील कोणा व्यक्तीला भेटण्यात गैर काय,'' असा प्रतिप्रश्न पवार यांनी केला आहे. सांगोला येथे शेकापचे दिवंगत ज्येष्ठ नेते गणपतराव देशमुख यांच्या पुतळय़ाच्या अनावरण सोहळय़ासाठी पवार आले असता त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला.



शरद पवार

त्यावेळी त्यांना अजित पवार यांच्याशी कथित गुप्त भेटीबाबत विचारण्यात आले. यावर ते म्हणाले, की अजित हा माझा पुतण्या आहे. पवार कुटुंबीयांतील मी वडीलधारा माणूस आहे. त्यामुळे मला कोणी भेटायला यावे किंवा मी कोणाला भेटायला बोलावले, हा चर्चेचा विषय असू शकत नाही. राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर अजित पवार आणि काही नेते भाजापबरोबर सत्तेत सहभागी झाले असले तरी आपण मूळ राष्ट्रवादी काँग्रेसला सोबत घेऊन काम करणार आहोत. भाजपशी सलगी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. भाजपशी विचारधारा आणि आमची विचारधारा वेगळी आहे. त्यामुळे आपल्या भूमिकेत बदल होणार नाही, असेही पवार यांनी स्पष्टपणे नमूद केले.

# मुंबई विमानतळावर दीड कोटीचे हिरे जप्त

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** चहा पाकिटांमध्ये दीड कोटी रुपयांचे हिरे लपवून आणणाऱ्या व्यक्तीला बुधवारी विमानतळावर पकडण्यात आले. सीमा शुल्क विभागाच्या हवाई गुप्तचर कक्षाच्या (एआययू) अधिकाऱ्यांनी ही कारवाई केली. मुक्कीम रझा अश्रफ मन्सुरी असे अटक आरोपीचे नाव असून तो दक्षिण मुंबईतील रहिवासी आहे. तो दुबईहून मुंबई आला होता. त्याने चहाच्या पाकिटामध्ये ३४ हिरे आणले होते. ते हिरे १५५९.६८ कॅरेटचे असून त्यांची किंमत एक कोटी ४९ लाख रुपये असल्याची माहिती अधिकाऱ्याने दिली. त्याला हिऱ्यांच्या तस्करीसाठी पैसे देण्यात येणार होते; पण त्यापूर्वीच त्याला अटक झाली.




# सलग ७६ तास स्वच्छता मोहिम

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या ७६ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून सांगलीतील निर्धार फौंडेशनच्या तरूणांनी शहरातील सार्वजनिक ठिकाणांची सलग ७६ तास स्वच्छता मोहीम सुरू केली आहे. सलगपणे तीन दिवस, तीन रात्री चालणार्या या स्वच्छता मोहिमेला सांगलीतील हुतात्मा स्मारकापासून सुरूवात करण्यात आली आहे. बसस्थानक, पोलीस ठाणे, रस्त्यावरील दुभाजके, महापुरूषांचे पुतळे आदींची या मोहिमेमध्ये स्वच्छता व रंगरंगोटी करण्यात येत आहे.

स्वच्छतेचा नारा देत गेली १ हजार ९२९ दिवस अव्याहतपणे काम करणार्या निर्धार फौंडेशनचे अध्यक्ष राकेश दड्डणावर आणि त्यांच्या सहकार्यांकडून ही मोहिम हाती घेण्यात आली आहे. हुतात्मा स्मारक येथे महापालिकेचे उपायुक्त राहूल रोकडे यांच्या प्रमुख उपस्थितीत या मोहिमेचा शनिवारी शुभारंभ करण्यात आला. सार्वजनिक ठिकाणी जमलेला पालापाचोळा, अनावश्यक वाढलेले गवत-झाडेझुडपे, प्लास्टिक आदि गोळा करून स्वच्छता करण्यात येत आहे.. दुपारी विश्रामबाग पोलिस ठाण्यात स्वच्छता अभियान करून सिमेंटची आसने, कठडे व दर्शनी भिंत आकर्षक रंगसंगतीने रंगविण्यात आली. रात्री जिल्हा परिषद समोरील रस्ता दुभाजकालगतची माती व तण काढण्यात आले.



सांगली : सार्वजनिक ठिकाणांची सलग ७६ तास स्वच्छता मोहीम करणारे निर्धार फौंडेशनचे सदस्य

या उपक्रमाबाबत दड्डणावर म्हणाले, शहरातील विविध ठिकाणी सलग ७६ तास स्वच्छता राबवित १५ ऑगस्ट सकाळी १० वा शहीद अशोक कामटे चौक येथे या अभियानाची सांगता होणार आहे. सर्व स्वच्छता प्रेमी नागरिकांचे या उपक्रमात सहभागी होउन शहर स्वच्छतेच्या उपक्रमात सहभाग नोंदवावा.या उपक्रमामध्ये अनिल अंकलखोपे, भरतकुमार पाटील, वसंत भोसले, गणेश चलवादे, मनोज नाटेकर, रफिक मोमीन, रोहीत कोळी, मानस साहु, अनिरुद्ध कुंभार आदी युवक सहभागी झाले आहेत.

# संपादकिय

## मलिकांना तात्पुरता जामीन का?

माजी मंत्री राष्ट्रवादीचे नेते आम. नवाब मलिक यांना सर्वोच्च न्यायालयाने अखेर वैद्यकीय कारणास्तव दोन महिन्यांचा जामीन मंजूर केला आहे. तुरुंगविषयक नियमावलीनुसार, जामीन हा प्रत्येक आरोपीचा हक्क आहे. मलिक यांचा जामीन उच्च न्यायालयाने फेटाळला. मात्र सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरता जामीन दिला.

नबाव मलिक यांनी कुर्ला येथील लाल बहादूर शास्त्री मार्गावर कोट्यवधी रुपयांचा भूखंड अत्यंत अल्प किमतीत विकत घेतला. ज्यांच्याकडून भूखंड खरेदी करण्यात तो मुंबई बॉम्बस्फोटाशी संबंधित तर दुसरी व्यक्ती संघटित गुन्हेगार होती. यातील एक कुख्यात गुंड दाऊदची बहिण हसीना पारकर हिचा अंगरक्षक होता. हा भूखंड बॉम्बस्फोट तसेच संघटित गुन्हेगाराशी संबंधित असल्यामुळे तो सरकारदरबारी जमा होणे आवश्यक होते. परंतु तो विकत घेऊन नबाव मलिक यांनी गुन्हेगारांचा भूखंड वाचविला, असा आरोप तेव्हा विरोधी पक्षनेते असलेले देवेंद्र फडणवीस यांनी केला होता. या प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाने मलिक यांना २३ फेब्रुवारी २०२३ रोजी अटक केली होती

नवाब मलिक हे मूत्रपिंड विकार व इतर आजारांमुळे सध्या रुग्णालयात आहेत. अशा वेळी जर तपास यंत्रणांचे काही म्हणणे असेल तर त्यांनी पाच आठवड्यात प्रतिज्ञापत्र सादर करावे. त्यानंतर आवश्यकता वाटल्यास आणखी पुढील तीन आठवड्यात पुरवणी प्रतिज्ञापत्र दाखल करावे. दहा आठवड्यानंतर या प्रकरणी सुनावणी होईल. वैद्यकीय कारणास्तव जामीन देत आहोत. गुणवत्तेवर आधारित हा जामीन नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांना पहिल्यांदा अटक झाली. त्यानंतर नवाब मलिक यांना अटक झाली. त्यानंतर राज्यसभा सदस्य संजय राऊत यांनाही अटक झाली. देशमुख यांना सर्वोच्च न्यायालयाने जामीन दिला तर राऊत यांना काळा पैसा प्रतिबंधक कायद्याअंतर्गत विशेष न्यायालयाने जामीन दिला. देशमुख आणि राऊत यांना रीतसर जामीन मंजूर झाला. मात्र मलिक यांना तात्पुरता जामीन मंजूर झाला आहे. याचा अर्थ त्यांच्यावरील वैद्यकीय उपचार पूर्ण होईपर्यंत हा जामीन लागू राहील. सध्या दोन महिन्यांची मुदत असली तरी ती वाढवता येते. मात्र जामिनाबाबत सर्वोच्च न्यायालयाने गुणवत्तेवर निकाल न दिल्यास मलिक यांना पुन्हा तुरुंगात जावे लागेल.


वैद्यकीय कारणास्तव मिळालेला जामीन हा तात्पुरता असणार आहे पूर्ण कल्पना नवाब मलिक यांना असणार आहे. कायदेशीर मार्गाने ते जामिनासाठी सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचले आहेत. त्यामुळे त्यांच्यावर दाखल असलेला गुन्हा काळा पैसा प्रतिबंधक कायद्याअंतर्गत लागू होत नाही हा मुद्दा पुन्हा उचलून धरू शकतील. ही सुनावणी पूर्ण होऊन रीतसर जामीन मंजूर होणे वा फेटाळला जाईपर्यंत मलिक यांना तात्पुरत्या जामिनाच्या स्वरूपात संरक्षण मिळेल. प्रत्येक वेळी कडाडून विरोध करणाऱ्या सक्तवसुली संचालनालयाने सर्वोच्च न्यायालयात विरोध का केला नाही वा त्यांची भूमिका काय असेल यावर मलिक यांचा रीतसर जामीन अवलंबून आहे.

राज्यातील सत्तेत सहभागी झालेल्या अजित पवार गटामुळे मलिकांविरोधातील भूमिका मवाळ झाली का? अशी ही शंका येत असली तरी न्यायालयाने दिलेला निर्मय आणि राजकीय घटना यांचा फक्त योगायोग म्हणावा लागेल.

## तेजोमय शौर्याचे मूर्तीमंत उदाहरण : नागनाथअण्णा नायकवडी

महात्मा गांधी आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या विचारांनी प्रेरित होऊन देशाच्या स्वातंत्र्यासाठी मोठा लढा उभारणारे वाळवा (जि. सांगली) येथील पद्मभूषण क्रांतीवीर नागनाथअण्णा नायकवडी स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून अखेरपर्यंत लढले. अहिंसा आणि गरज पडेल तिथे गोळीला गोळीने उत्तर या तंत्राने त्यांनी स्वातंत्र्य लढा गाजवला.अनेक क्षण त्यांच्या जिवावर बेतले पण त्यांनी माघार घेतली नाही.

जुन्या सातारा जिल्ह्यातील प्रतिसरकारचा ते एक मोठा भाग होते. क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली काम करताना त्यांनी ब्रिटिशांना अक्षरशः जेरीस आणले होते. शिराळा पेठेतील दुर्गम भागात त्यांनी आझाद हिंद सेनेच्या धर्तीवर स्वतंत्र शस्त्रसज्ज फौज निर्माण केली होती.त्यासाठी दिल्ली आणि पंजाब येथील नानक सिंग आणि मन्सासिंग यांना विशेष प्रशिक्षक म्हणून आणले होते.गोवा येथून ब्रिटिशांचा शस्त्रसाठा त्यांनी मोठ्या धाडसाने लुटला होता. वाळवा आणि शिराळा तालुक्यातील अनेक ठिकाणी त्यांनी क्रांतिकारकांच्या फौजा तयार करून ब्रिटिशांशी लढा दिला. लढाई केवळ धैर्य आणि ताकदीने होत नाही तर त्यासाठी पैसाही लागतो. म्हणून त्यांनी ब्रिटिश सरकारचा पैसा लुटण्यासाठी रणनीती आखली.शेकडो मैल दूर त्यांनी धुळे येथे ब्रिटिशांचा पैसा घेऊन जाणारी रेल्वे लुटली. तशीच वाळवा आणि कराड तालुक्याच्या सीमेवर पे ट्रेन लुटली. या लुटीचा उल्लेख देशाच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद आहे.



नागनाथअण्णा नायकवडी म्हणजे कमालीचे धाडस, जिवावर उदार होऊन ब्रिटिशांच्या विरोधात लढण्याची तयारी असे अजब रसायन होते. धुळे खजिना लुटीच्या वेळी झालेल्या धुमश्चक्रीत त्यांना गोळी लागली होती. पण ती किरकोळ स्वरूपाची होती. सातारा जेलच्या तटावरून त्यांनी मारलेली उडी त्यांच्या अप्रतिम शौर्याचे प्रतिक मानले जाते. शेवटचा इंग्रज देशांतून बाहेर जाईपर्यंत लढाई थांबवायची नाही या ध्येयाने झपाटलेल्या नागनाथअण्णा नायकवडी यांनी त्यासाठी अखंड लढा दिला. मुंबई येथील गवालिया टँक मैदानावर महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली चले जाव, करो या मरो चा नारा देण्यात आला. आणि संपूर्ण देशात तो वणव्यासारखा पसरला. त्या सभेला नागनाथअण्णा नायकवडी यांना प्रवेश मिळाला नाही म्हणून त्यांनी मैदानाच्या बाजूला असलेल्या झाडावर चढून मैदानात उडी टाकली आणि महात्मा गांधी यांचे भाषण ऐकून ते वाळव्यात आले. आणि क्रांतीची धग अधिकच वाढली. शिराळा तालुक्यातील मणदूरच्या रणसंग्रामात त्यांचे सहकारी किसन अहिर आणि नानकसिंग ब्रिटिशांशी लढताना हुतात्मा झाले.

नागनाथअण्णा नायकवडी यांनी देशाच्या स्वातंत्र्यानंतर सामान्य जनता, शेतकरी, कष्टकरी, कामगार, पददलित जनतेच्या हक्कांसाठी मोठा लढा उभारला. धरणग्रस्त, दुष्काळग्रस्तांना त्यांच्या हक्काचे लाभ मिळाले पाहिजेत, यासाठी त्यांनी मोठा संघर्ष केला. आज राज्यात स्थापन झालेले कृष्णा खोरे विकास महामंडळ हे अण्णांच्या लढ्याचे फलित आहे. तर धरणग्रस्तांचे जे काही पुनर्वसन झाले आहे, त्यामागे अण्णांचा अखंड संघर्ष कारणीभूत आहे. नागनाथअण्णा नायकवडी यांनी शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळाला पाहिजे म्हणून आंदोलने केली. सामान्य माणूस विकासाचा भागीदार झाला पाहिजे म्हणून ते अखेरपर्यंत लढले. प्रचंड इच्छाशक्ती, कमालीचे धाडस, तेजोमय शौर्याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे नागनाथअण्णा नायकवडी होते.

**महादेव अहिर**

## भिडेंच्या उपस्थितीत शिवप्रतिष्ठानची हिंदवी स्वराज्य पदयात्रा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** महात्मा गांधी यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने अडचणीत आलेल्या शिवप्रतिष्ठानचे संस्थापक संभाजी भिडे यांच्या उपस्थितीत मंगळवारी स्वातंत्र्यदिनादिवशी सांगलीत हिंदवी स्वराज्य स्वातंत्र्यदिन पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या पदयात्रेला पोलीसांनी काही अटींसह सोमवारी परवानगी दिली.



संभाजी भिडे

वप्रतिष्ठानच्यावतीने काढण्यात येणार्या हिंदवी स्वराज्य स्वातंत्र्यदिन पदयात्रेला परवानगी देण्यात येउ नये अशी मागणी काही पुरोगामी संघटनांनी केली होती. पोलीस अधिकारी व संघटनेचे पदाधिकारी यांची बैठक झाली. या बैठकीनंतर पदयात्रेला परवानगी देण्यात येत असल्याचे पोलीसांनी सांगितले. या पदयात्रेमध्ये संघटनेचे संस्थापक संभाजी भिडे हे स्वत: हजर राहणार असल्याचे सांगण्यात आले.

पदयात्रेच्या अनुषंगाने पोलिसांनी शिवप्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांना नोटिसा बजावत आक्षेपार्ह घोषणाबाजी आणि जातीय तेढ निर्माण होणार नाही याची खबरदारी घेण्याच्या दिल्या सूचना दिल्या आहेत. या अटी पाळूनच पदयात्रा काढण्यात यावी, जर काही अनुचित प्रकार घडला तर या नोटीसाच पुढील कारवाईसाठी पुरावा म्हणून वापरण्यात येतील असेही नोटीसमध्ये म्हटले आहे.

## राष्ट्रध्वजाच्या अवमान प्रकरणी गायिकेविरुद्ध गुन्हा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पुणे :** कोरेगाव पार्क भागातील एका पबमध्ये एका गायिकेने राष्ट्रध्वज प्रेक्षकांमध्ये भिरकावल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी मुंढवा पोलिसांनी गायिकेविरुद्ध गुन्हा दाखल केला. याप्रकरणी गायिका उमा शांती, कार्तिक मोरे (रा. औंध) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. कोरेगाव पार्क भागातील हॉटेल फ्रेक सुपर क्लबमध्ये रविवारी मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास ही घटना घडली. याबाबत पोलीस हवालदार तानाजी देशमुख (वय ४५) यांनी मुंढवा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हॉटेल फ्रेक सुपर क्लबमध्ये कार्तिक मोरे याने स्वातंत्र्य दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित केला होता. शांती पिपल म्युझिक बँडमधील गायिका उमा शांती हिने गाताना दोन्ही हातात राष्ट्रध्वज घेतला होता. राष्ट्रध्वज हातात धरुन ती नाचत होती. तिने प्रेक्षकांमध्ये राष्ट्रध्वज भिरकावला. याबाबतची चित्रफीत प्रसारित झाल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. सहायक पोलिस निरीक्षक संदीप जोरे तपास करत आहेत.






## कळवा रुग्णालयातील मृत्यूप्रकरणाची चौकशी होणार : एकनाथ शिंदे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या कळवा रूग्णालयात याआधी एकाच दिवशी ५ तर गेल्या २४ तासाच १८ रूग्णांचा मृत्यू झाल्याची दुदैवी घटना घडली आहे. या घटनेनंतर आता महापालिका रूग्णालयाच्या कारभारावरून टीका होत आहे,तसेच या घटनेने राजकीय वातावरण देखील तापले आहे. या घटनेची गंभीर दखल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेऊन चौकशी समिती गठीत केली आहे. या समितीला संपूर्ण प्रकरणाचा अहवाल ४८ तासात मुख्यमंत्र्यांना द्यायचा आहे, अशी माहिती ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिली आहे.

महापालिकेतील कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालयात याआधी ५ रूग्णांचा मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला होता. यानंतर आता शनिवारी रात्रीपासून रविवारी सकाळपर्यंत २४ तासात १८ रूग्णांचा मृत्यू झाल्याची दुदैवी घटना घडली आहे. यामध्ये ८ पुरुष आणि १० महिलांचा समावेश आहे.मृत्यू झालेल्यांमध्ये ६ लोक ठाणे शहर आणि जिल्हा परिसरात राहणारे आहेत, ४ कल्याणमधील, ३ भिवंडी येथील आहेत, तर उरलेले इतर ठिकाणाहूनही लोक आले आहेत.

रूग्णालयात आलेल्या एकाने रॉकेल पिले होते, तर एकाला साप चावला होता, त्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. दोन रुग्ण असे होते की, त्यांची फुफ्फुस खराब झाले होते. त्यांचा संसर्ग होऊन मृत्यू झाला. तीन-चार रुग्ण असे होते की, मल्टि ऑर्गन डिसफंक्शनमुळे त्यांचा मृत्यू झाला. काही अनियंत्रित मधुमेह होता. काही हृदयाचा आजार होता. त्यामुळे हे रुग्ण मरण पावले, असे रूग्णालय प्रशासनाने म्हटले आहे. या सर्व प्रकरणाची दखल आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली आहे. मुख्यमंत्री शिंदे यांच्या आदेशानुसार आरोग्य सेवा आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीत ठाणे जिल्हा अधिकारीही सहभागी असणार आहेत. या घटनेतील नागरीकांचा मृत्यू कसा झाला? याची कारणे ही समिती शोधणार आहे. ही समिती नेमल्यानंतर ४८ तासांत मुख्यमंत्र्यांनी अहवाल द्यायचा आहे, अशी माहिती अभिजीत बांगर यांनी दिली आहे.

## खडीक्रशर कारवाईचे नावाखाली सील, पुन्हा चालू

### संजय भोसले : महसूलची जनतेच्या डोळ्यांत धूळफेक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/अहमद मुल्ला :** माण तालुक्यातील महसूलचे चारा छावण्यातील भगदाड कोर्टात जाऊन उघडे पाडावे लागले असतानाच आता खाण माफीयांचे आणि महसूल अधिकार्यांचे लागेसंबंध पैसा आणि सत्ता यातून जनतेच्या तक्रारी आल्या की छातूरमातूर कारवाया करत सील बंदचे नाटक करणारे महसूल विभाग आणि खाण माफीयांचे आर्थिक लागेबंध असल्याचे शिवसेनेचे सातारा जिल्हाध्यक्ष संजय भोसले यांनी पत्रकार परिषदेमध्ये केले आहे.



संजय भोसले

पुढे बोलताना संजय भोसले म्हणाले, गावगड्यांपासून जमिनीच्या इंच न इंच क्षेत्राची माहीती ठेवणारे कोतवाल, तलाठी, मंडल अधिकारी ते तहसिलदार आणि सोबतीला पोलीस लवाजमा असताना ५ मार्च २०२२ रोजी सील केलेले क्रशर आजमितीपर्यंत चालू राहतातच कसे? कसे यामध्ये अधिकार्यांची टोळी सामील असलेखेरीज असे प्रकार घडूच शकत नाहीत. सील क्रशर एका दिवसापुरते देखील सील नसावेत असा संशय व्यक्त करतानाच स्वत:ची कातडी वाचविण्यासाठी नाममात्र कारवाया करुन शासनाचा महसूल बुडवत क्रशर मालकांचे आणि अधिकार्यांचे उकळ भरण्याचा हा मोठा डाव असल्याचे ते म्हणाले.

कोट्यावधीचे उत्खनन व चोरी लपवण्यासाठीच असे प्रकार घडविले जातात. जर का असे काही नाही तर मग तालुक्यात खपवलेली खडी, डस्ट, बांधकामासाठी वापरलेली कच ही कुठून आली आणि याचा महसूल कोणी बुडविला. ज्यांचे क्रशर चालू होते त्यांची माहिती काढून त्यांचेवरती कलम ३७९ प्रमाने महसूलने आज पर्यंत गुन्हे का दाखल केले नाहीत? हा जनसामान्यांचा प्रश्न असलेचे भोसले म्हणाले असून लवकरच याही बाबत न्यायालय, लोकपाल, यांचेकडे तक्रारी दाखल करणार असलेचे त्यांनी यावेळी नमूद केले आहे.






दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

दैनिक
माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस






# शरद पवार चार वर्षानंतर 'शिवरत्न'वर

## विजयसिंह मोहिते पाटील यांच्या प्रकृतीची केली विचारपूस

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**माळशिरस :** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी रविवारी अकलूज येथील शिवरत्न बंगल्यावर जाऊन माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. तब्बल चार वर्षांनंतर पवार हे 'शिवरत्न' बंगल्यावर आले होते.

विजयदादा हे व्हिलचेअरवर कार्यक्रमाला आले होते. पवार यांनी व्यासपीठावरच विजयसिंह मोहिते पाटील यांची विचारपूस केली होती. त्यावेळी त्यांना विजयदादा हे आजारी असल्याचे समजले. कार्यक्रम संपल्यानंतर आपण अकलूजला जाऊन मोहिते पाटील यांच्या प्रकृतीची विचारपूस करणार असल्याचे पवार



अकलूज : येथे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या बंगल्यावर जावून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करताना शरद पवार

यांनी जाहीर केले होते. त्यानुसार त्यांनी अकलूजला 'शिवरत्न' बंगल्यावर जाऊन विजयदादांची भेट घेतली. शरद पवार हे तब्बल चार वर्षांनंतर 'शिवरत्न' बंगल्यावर आले होते. यापूर्वी २०१९ मध्ये कृषी प्रदर्शनाच्या निमित्ताने पवार हे अकलूजमध्ये आले होते. त्यावेळी ते शिवरत्न बंगल्यावर आले होते. रविवारी अकलूजमध्ये जाऊन विजयदादांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. विजयसिंह मोहिते पाटील हे काही महिन्यांपूर्वी पाय घसरून पडले आहेत. तेव्हापासून ते आजारी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अशा अवस्थेतही भाई गणपतराव देशमुख यांच्यावरील प्रेमापोटी ते रविवारी सांगोल्यातील कार्यक्रमाला आले होते. राष्ट्रवादीपासून दुरावल्यानंतरही शरद पवार यांनी मोहिते पाटील यांची भेट घेऊन चौकशी करत वैयक्तिक संबंध कसे जपावेत,हे नव्या पिढीतील राजकारण्यांना दाखवून दिले आहे.

# अजितदादा- शरद पवार यांच्या भेटीची जागा 'चोर'डिया नावाच्या ठिकाणीच : राज ठाकरे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांची उद्योगपती अतुल चोरडिया यांच्या निवासस्थानी भेट झाली. त्यावरून राजकीय राजकारणात चर्चांना उधाण आलं आहे. अजित पवार हा माझा पुतण्या आहे. त्यामुळे तो वडीलधाऱ्यांना तो भेटला तर बिघडलं कुठं? असं स्पष्टीकरण शरद पवार यांनी दिलं आहे. तर, नातीगोती घरात. तुम्ही नाती जपणार. एकमेकांसोबत चहा घेणार. आणि कार्यकर्त्यांनी रस्त्यावर एकमेकांची डोकी फोडायची का? असा सवाल ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. तर या वादात आता मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही उडी घेतली आहे. राष्ट्रवादीतील फूट हा शरद पवार यांचाच गेम असल्याचा दावा राज ठाकरे यांनी केला आहे.

राज ठाकरे यांनी मनसेच्या पदाधिकाऱ्यांची



राज ठाकरे

बैठक घेतली. लोकसभा, विधानसभा आणि महापालिका निवडणुकीचा या बैठकीत आढावा घेण्यात आला. त्यानंतर राज ठाकरे यांनी मीडियाशी संवाद साधला. शरद पवार यांनी एक टीम आगोदर पाठवली, दुसरी जाईल हे मी तेव्हाच म्हणालो होतो. तुम्ही त्याकडे तेव्हा लक्ष दिलं नाही. हा शरद पवार यांचाच गेम आहे. हे आतून एकमेकांना मिळाले आहेत. २०१४ पासून हे सर्वजण एकमेकांना मिळालेले आहेत. फक्त शरद पवार आणि अजित पवार यांना भेटायची जागा 'चोर'डीया या नावावर मिळाली ही कामाल आहे, असा चिमटा राज ठाकरे यांनी काढला.

युती आणि आघाडी करायची की नाही या गोष्टी परिस्थितीनुसार ठरतात, असं राज ठाकरे म्हणाले. सरकार काय सगळीकडे कन्फ्यूजन आहे. कोण कुणाचा आहे हे कळत नाही. उलटा फिरल्यावर कोणत्या पक्षाचा आहे हे कळतं असे ते म्हणाले.





# दीड वर्षानंतर नवाब मलिक यांची सुटका

## रुग्णालयातून बाहेर पडताच कार्यकर्त्यांकडून जंगी स्वागत

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** माजी मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांना सर्वोच्च न्यायालयाने दोन महिन्यांचा अंतरिम जामीन दिला आहे. जामीन मिळाल्यानंतर अखेर ते क्रिटी केअर रुग्णालयातून बाहेर पडले. नवाब मलिक यांच्या स्वागतासाठी राष्ट्रवादीचे अनेक नेते आणि कार्यकर्ते जमा झाले होते. कार्यकर्त्यांनी नवाब मलिकांचं जंगी स्वागत केलं आहे. सर्वोच्च न्यायालयाने नवाब मलिक यांना आरोग्याच्या कारणास्तव दोन महिन्यांचा अंतरिम जामीन दिला आहे.

जामीन मिळाल्यानंतर सर्व कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर नवाब मलिक रुग्णालयातून बाहेर पडले. आमदार



मुंबई : रुग्णालयातून बाहेर पडताच कार्यकर्त्यांकडून नवाब मलिक यांचे जंगी स्वागत करण्यात आले.

मलिक रुग्णालयातून बाहेर पडताच कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला. नवाब मलिक क्रिटीकेअर रुग्णालयातून बाहेर पडताच कार्यकर्त्यांनी कोण आला रे कोण आला, राष्ट्रवादीचा वाघ आला, नवाब मलिक तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है अशा घोषणा कार्यकर्त्यांनी दिली. शरद पवार गट आणि अजित पवार गटाचे महत्त्वाचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी येथे उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळेही सायंकाळपासून रुग्णालयाच्या बाहेर उपस्थित होत्या.

न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर अखेर दीड वर्षांनी नवाब मलिक यांची तुरुंगातून सुटका झाली आहे. मागील काही दिवसांपासून नवाब मलिक क्रिटीकेअर रुग्णालयात उपचार घेत होते, त्यामुळे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी काल दुपारपासूनच रुग्णालयाबाहेर गर्दी केली. नवाब मलिक रुग्णालयातून बाहेर पडताच कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.

# भारतीय राष्ट्रध्वजाला आव्हान देणाऱ्या रॅलीस व सभेला परवानगी देवू नका

## वंचितचे सांगली जिल्हा पोलीस प्रमुखांना निवेदन

माणदेश एक्सप्रेस न्युज

सांगली : भारतीय राष्ट्रध्वजाला आव्हान देणाऱ्या रॅलीस व सभेला परवानगी देवू नका अशा मागणीचे निवेदन वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनचे सांगली जिल्हाध्यक्ष संजय कांबळे यांनी जिल्हा पोलीस प्रमुखांना देण्यात आले

सद्यस्थितीत संपूर्ण महाराष्ट्र व देशात भारतीय स्वातंत्र्य दिन, राज्यघटना व राष्ट्रध्वज अवमान कारक विधाने काही मनुवादी विचाराचे लोक करत आहेत. यामुळे समाजात जाती-जातींमध्ये तेढ निर्माण करून दंगल घडविण्यासाठी वातावरण निर्माण करत आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांनी १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त संपूर्ण भारतभर हर घर तिरंगा हा नारा देऊन प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटावे म्हणुन राष्ट्रध्वज घरासमोर फडकवला पाहिजे असे आवाहन केले. पण काही देशद्रोही, विघ्नसंतोषी,मानसिक विकलांग प्रवृत्तीचे लोक हे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित राज्यघटनेतून निर्माण झालेल्या लोकशाहीला विरोध करून छत्रपती शिवाजी महाराज महाराजांच्या विचारातील शिवशाहीला काही मनुवादी विचार मानणाऱ्या जयचंदाच्या



सांगली : जिल्हा पोलीस प्रमुख यांना निवेदन देताना वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी

औलादी विरोध करीत आहेत.

अशा मनुवादी जयचंदाच्या औलादीवर राष्ट्रद्रोहाचे गुन्हे दाखल झाले पाहिजेत. मुळचे मनोहर कुलकर्णी आताचे नामधारीत संभाजी भिडे यांनी अनेकदा थोर विचारवंत, समाजसुधारक, महापुरुषांच्या तसेच भारतीय संविधान आणि राष्ट्रध्वजा बद्दल बेताल वक्तव्ये करून सतत गरळ ओकत आहेत, दिशाभूल करीत बहुजन समाजातील तरुण पिढीला चुकीचा इतिहास सांगून, द्वेष पसरविण्याचे काम करीत आहेत.अशामुळे सामाजिक सलोखा बिघडण्याचे कारस्थाने करीत आहेत, बौद्धिक क्षमता नसलेली देशद्रोही प्रवृत्तीचे लोक त्यांचे समर्थन करीत आहेत.

अशा समाज विघातक विचारांना जेल मध्ये बंद करून देशाची एकता अखंड ठेवून सर्वांना विश्वास द्यावे व कायद्याचे पालन होणे आवश्यक आहे. त्यामुळे १५ ऑगस्ट रोजी भारतीय स्वातंत्र्य दिन, राज्यघटना, राष्ट्रध्वज विरोधी कोणत्याही प्रकारच्या रॅलीस, सभेस परवानगी देण्यात येऊ नये अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी अनिल मोरे, युवराज कांबळे, मंजुनाथ कांबळे, मेजर कुमार कांबळे, दिपाली वाघमारे, पवन उर्फ शिवाजी वाघमारे, जितेंद्र कांबळे, जगदीश कांबळे, प्रदीप मंचद, मोहन साबळे, दिनेश साबळे, मधुकर कोलप, यशोधन सनदी, विनायक मेलघे, हिरामण भगत, जावेद आलासे, मानतेश कांबळे, इसाक सुतार, ऋषिकेश माने, आनंद गाडे, विक्रांत गायकवाड, सचिन कांबळे, सिद्धार्थ कांबळे, बंदेनवाज राजरत्न, संगाप्पा शिंदे आदी उपस्थित होते.



# तर आम्ही भाजपाच्या चिन्हावर निवडणूक लढवू : किशोर पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ४० आमदारांनी बंडखोरी केल्यानंतर 'शिवसेना' पक्षनाव आणि 'धनुष्यबाण' पक्षचिन्ह यावरून दोन गटात वाद सुरू आहे. याआधीच निवडणूक आयोगानं मूळ शिवसेना ही एकनाथ शिंदे यांची असेल, असा निर्णय दिला आहे. या निर्णयाविरोधात ठाकरे गटानं सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यामुळे मूळ शिवसेना कुणाची आणि धनुष्यबाण पक्षचिन्ह कुणाचं याबाबत अद्याप संभ्रम कायम आहे. एकनाथ शिंदे यांच्यासह १६ आमदारांच्या अपात्रतेबाबतचा निर्णयही प्रलंबित आहे. असं असताना शिंदे गटाचे आमदार किशोर पाटील यांनी मोठ विधान केले आहे.



एकनाथ शिंदे

तांत्रिक अडचण आली तर आम्ही भारतीय जनता पार्टीच्या निवडणूक चिन्हावर (कमळ) निवडणूक लढवू, असे विधान किशोर पाटील यांनी केले. आमचे सर्व निर्णय आमचे सर्वेसर्वा एकनाथ शिंदे घेतील. ते जसे सांगतील तसाच निर्णय आम्ही घेऊ, असेही किशोर पाटील म्हणाले. यावेळी किशोर पाटील म्हणाले, महाराष्ट्रात 'धनुष्यबाण' आणि 'शिवसेना' आमचीच आहे, हे सिद्ध झाले आहे. हे निवडणूक आयोगानेही जाहीर केले आहे. त्यामुळे ९९.९ टक्के भाजपाच्या निवडणूक चिन्हावर निवडणूक लढण्याची आमच्यावर वेळ येणार नाही. पण जर तांत्रिक अडचण निर्माण झाली, तर कदाचित तसा निर्णय होऊ शकतो. एकनाथ शिंदे यांनी जर सांगितलं की, आपल्या सर्वांना अपक्ष निवडणूक लढायची आहे, तर आम्ही अपक्ष निवडणूक लढवू. एकनाथ शिंदेंनी सांगितलं की, आपल्याला भाजपाकडून लढायचं आहे, तर आम्ही भाजपाकडून लढू. आमचे सर्व निर्णय आमचे सर्वेसर्वा एकनाथ शिंदे घेतील. ते जसे सांगतील, तसेच सगळं होईल, असेही किशोर पाटील म्हणाले.

# सुपरस्टार-मेगास्टारच्या यांच्या चित्रपटांत स्पर्धा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** मेगास्टार चिरंजीवीचा भोला शंकर आणि सुपरस्टार रजनीकांतचा जेलर या आठवड्यात बॉक्स ऑफिसवर स्पर्धा करत आहे. एकीकडे, जेलरला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे आणि तो दिवसेंदिवस वाढतच चालला आहे, भोला शंकरला म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही. अनपेक्षितपणे चित्रपटाची कमाई म्हणावी तशी झालेली नाही.

या रविवारपर्यंत पहिल्या आठवड्यात, जेलरने जवळपास २० कोटी कमावले. स्वातंत्र्यदिनाची सुट्टी आहे. त्यामुळे हा चित्रपट पुढील काही दिवस बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करेल, अशी अपेक्षा आहे. एकूणच, जेलर चित्रपटाने वर्ल्डवाईड ३०० कोटींहून अधिक कमाई केली आहे. परदेशात १२५ कोटींची कमाई झाली. तामिळनाडूत ८५ कोटी रु., केरळ २३ कोटी, आंध्र ३० कोटी, कर्नाटक ३० कोटी आणि अन्य राज्यामध्ये १० कोटींचा बिझनेस केला आहे. तर भोला शंकरने पहिल्या आठवड्यात निराशाजनक कमाई केली. वर्ल्डवाईड २४ कोटींची कमाई केली.

# येत्या २-३ दिवसांत राज्याचा खरा मुख्यमंत्री कोण हे स्पष्ट होईल : आदित्य ठाकरे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** अजित पवार गट सत्तेत सामील झाल्यानंतर राज्याचा मुख्यमंत्री बदलण्यात येणार अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. यावर आमदार आदित्य ठाकरे यांनी मोठं वक्तव्य केले आहे. 'येत्या दोन-तीन दिवसात कळेल की खरा मुख्यमंत्री कोण हे स्पष्ट होईल, असे भाकीत आदित्य ठाकरे यांनी केले आहे.



आदित्य ठाकरे

आदित्य ठाकरे यांनी बीडीडी प्रकल्पाला भेट दिली. त्यादरम्यान त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी आदित्य ठाकरे यांनी राज्यातील विविध मुद्द्यांवर भाष्य केले. आदित्य ठाकरे म्हणाले, 'आता काय झाले आहे की खरा मुख्यमंत्री कोण हे संभ्रम आहे. येत्या दोन तीन दिवसात कळेल की खरा मुख्यमंत्री कोण हे स्पष्ट होईल. अजित पवार आणि शरद पवार भेटीवर भाष्य करताना आदित्य ठाकरे म्हणाले, 'सामनात जे आले, ती पक्षाची भूमिका आहे. संजय राऊत यांनी जे मांडलं, तीच आमची भूमिका आहे. बीडीडी प्रकल्पाबाबत सांगताना आदित्य ठाकरे म्हणाले, 'अपेक्षित होता तसा, या प्रकल्पाचा विकास चालू आहे . आपल्या काळात हा प्रकल्प सुरू झाला होता. माझी सवय आहे की, जे काम आमच्या काळात सुरू झाले आहे, त्यावर मी लक्ष ठेवून असतो.

# आयुष्याची सुंदर इमारत उभी करायची असेल भरपूर वाचन करा : प्राचार्य डॉ. सुरेश पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कडेपूर :** सोशल नेटवर्किंगच्या युगात वाचन संस्कृती कमी होत आहे. त्याचा विपरित परिणाम विद्यार्थ्यांच्या जडण घडणीवर होत आहे. आपले व्यक्तिमत्व समृध्द बनवायचे असेल तर वाचनाशिवाय पर्याय नाही. आपले मन वाचनामुळे समृद्ध व विशाल बनते. आयुष्याची सुंदर इमारत उभी करायची असेल भरपूर वाचन करा असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांनी केले.

ते राजे रामराव महाविद्यालय, जत येथे ग्रंथालय विभागाच्या वतीने भारतीय ग्रंथालयाचे जनक पद्मश्री एस.आर.स्वामीनाथन यांच्या जयंती निमित्त चरित्र ग्रंथ आणि स्वातंत्र्य सैनिकांच्या जीवनावरील पुस्तकांचं ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.



**जत : ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. सुरेश पाटील, ग्रंथालयीन प्रमुख प्रा.अभयकुमार पाटील, प्राध्यापक वृंद व विद्यार्थी**

त्याच्या उद् घाटन प्रसंगी ते बोलत होते. प्रारंभी ग्रंथालयीन प्रमुख प्रा. अभयकुमार पाटील यांनी ग्रंथप्रदर्शन आयोजित करण्यामागील हेतू सांगून कार्यक्रमाचे प्रासाविक केले. यावेळी बोलताना प्राचार्य पुढे म्हणाले की, पुस्तकांचा वापर करा आयुष्य सुंदर होईल. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून. मुक्तपीठ व एक तास ग्रंथालात असे नाविन्यपूर्ण उपक्रम ग्रंथालयाच्या वतीने राबविले जात आहेत. याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. ग्रंथालयात जवळ-जवळ ५६५५७ अशी पुस्तके व संदर्भग्रंथ असून याचा विद्यार्थांनं लाभ घेऊन आयुष्याची सुंदर इमारत उभी करावी असेही प्राचार्य शेवटी म्हणाले. प्रारंभी प्रास्ताविक व स्वागत ग्रंथालयीन प्रमुख प्रा.अभयकुमार पाटील यांनी तर शेवटी आभार प्रदर्शन ग्रंथालय कमिटीचे प्रमुख प्रा.नारायण सकटे यांनी केले. यावेळी प्रा.रामदास बनसोडे, प्रा.अशोक बोगूलवार, प्रा.ओंकार कुडाळकर, प्रा.नवनाथ लवटे व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिंदेंना मुख्यमंत्री पदावरून हटवण्यासाठी दिल्लीत हालचाली सुरू : विजय वडेट्टीवार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**गडचिरोली :** एकनाथ शिंदे यांना हटवून उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मुख्यमंत्री पद दिले जाईल, दावा खासदार संजय राऊत आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी काही दिवसांपूर्वी केला होता. त्यावरून बरचं राजकारणही रंगले. त्यानंतर आता पुन्हा राज्याचे विरोधी पक्ष नेते आणि काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी अजित पवार यांच्या मुख्यमंत्रीपदाचे संकेत दिले आहेत. आरोग्याच्या कारणावरून एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री पदावरून दूर करण्याचा दिल्लीतील हाय कमांडचा प्रयत्न सुरू असल्याचा दावा वडेट्टीवार यांनी केला आहे.

गडचिरोलीत बोलताना वडेट्टीवार म्हणाले, एकनाथ शिंदेंचे प्रवक्ते एक सांगतात त्यांची तब्येत ठिक नसल्यामुळे त्यांना ॲडमिट करायची गरज आहे, तर सीएमओ ऑफिसकडूनंही या बातमीला दोन दिवसात पुष्टी मिळते. हे पाहता मुख्यमंत्र्यांना आरोग्याच्या दृष्टीने ॲडमिट करायचं, आणि आरोग्याचं कारण पुढे करून त्यांचा राजीनामा घ्यायचा आणि अजित दादांना



विजय वडेट्टीवार

मुख्यमंत्री करण्याचा प्रयत्न तर सुरू नाही ना, अशी शंका येते. मुख्यमंत्री शिंदेंचा पावसाळी अधिवेशनातील सहभागही अत्यंत कमी होता. सीएम शिंदे १३ दिवसांच्या अधिवेशनाच्या काळात फक्त दोन दिवस उपस्थित होते. खालच्या सभागृहातही फक्त चार वेळा त्यांची उपस्थिती होती. तेही दिड दोन तासांची उपस्थिती होती.इतकच नव्हे तर, ही उपस्थिती, त्यांचा सहभाग, त्यांची सार्वजनिक कार्यक्रमांना टाळणे, आराम करण्यासाठी बाहेर जाणं, तब्येतीची काळजी घेणं, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत, महाराष्ट्रालाही त्यांच्या तब्येतीची काळजी आहे. त्यामुळे त्याचा खुलासा महाराष्ट्राला अपेक्षित आहे, असंही वडेट्टीवार यांनी नमुद केले.

मुख्यमंत्री एका पक्षाचे नाही तर संपूर्ण राज्याचे असतात. त्यांच्या प्रकृतीबाबत सीएमओ ऑफिसकडून जी माहिती समोर येतेय, ते पाहता आरोग्याच्या दृष्टीने त्यांना त्यांच्या पदापासून दूर करण्याचा प्रयत्न दिल्लीतील त्यांच्या हायकमांडने सुरू केला असावा, अशी भावना लोकांमध्ये पसरू लागल्या आहेत.

# सरकार आल्यापासून राज्यात मृत्यूचे तांडव : संजय राऊत

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** ठाणे महानगरपालिकेच्या कळवा येथील रुग्णालयात १८ रुग्णांचा मृत्यू झाला. या घटनेने राज्याच्या आरोग्य सेवेत एकच खळबळ उडाली असून एका आठवड्यात तब्बत २२ रूग्णांचा मृत्यू या रुग्णालयात झाला आहे. त्यामुळे सध्या ठाकरे गटासह महाराष्ट्र नव निर्माण सेनेकडून सरकारवर निशाना साधला जात आहे.



संजय राऊत

गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी देखील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह भाजप आणि भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांच्यावर टीका केली. त्यांनी राज्यात शिंदे-फडणवीस सरकार आल्यानंतर अशा दुर्घटना होत आहेत. समृद्धी महामार्गावर अपघाताच्या मालिका सुरूच असून येथे एका बस अपघातात २५ प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला. खारघरमध्ये महाराष्ट्र भूषण कार्यक्रमात गृहमंत्री अमित शाह असाताना उष्माघातानं १२ जणांचा मृत्यू झाला आणि आता ही रूग्णालयातील घटना ज्यात १८ रुग्णांचा मृत्यू झाला झाला असून हे सरकार सत्तेत आल्यपासून राज्यात मृत्यूचे तांडव सुरु असल्याचे संजय राऊत म्हणाले.





